**परराष्ट्र सचिव आणि जपानचे उप-परराष्ट्र मंत्री यांमध्ये नवी दिल्लीत परराष्ट्र सचिव-उपमंत्री स्तरीय संवाद (28 जुलै 2025)**

28 जुलै 2025

श्री. विक्रम मिसरी (परराष्ट्र सचिव) आणि श्री. ताकेहिरो फुनाकोशी (उप-परराष्ट्र मंत्री, जपान) यांमध्ये 28 जुलै 2025 रोजी नवी दिल्ली येथे द्विपक्षीय परराष्ट्र सचिव-उपमंत्री स्तरीय संवाद पार पडला.

2. संवादादरम्यान, परराष्ट्र सचिव आणि त्यांचे समपदस्थ यांनी इंडो-पॅसिफिक प्रदेशात आणि त्यापलीकडे शांतता, समृद्धी आणि स्थैर्यासाठी भारत-जपान विशेष धोरणात्मक आणि जागतिक भागीदारीचं वाढतं महत्त्व अधोरेखित केलं. राजकीय संबंध, संरक्षण आणि सुरक्षा, आर्थिक सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, पायाभूत सुविधा सहकार्य, तंत्रज्ञान आणि नागरिक परस्पर आदान-प्रदान यासह बहुआयामी भारत-जपान द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण व्याप्तीवर उभय देशांमध्ये चर्चा पार पडली. त्यांनी जागतिक आणि प्रादेशिक महत्त्वाच्या मुद्यांवरही विचारांचे आदान-प्रदान केले.

3. उभय देशांच्या संबंधांचा विविध आयामांमध्ये प्रगतीचा आढावा घेणे, सहयोगाच्या नवीन क्षेत्रांचा शोध घेणे आणि भारत-जपान दरम्यान मैत्री आणि सहकार्य अधिक मजबूत बनवण्यासाठी योगदान देणे यावर संवादाचा विशेष भर राहिला.

**नवी दिल्ली**

28 जुलै 2025